सत्यमेव जयते

Price-Rs. 3000/-

मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) विश्रांतवाडी, येरवडा, पुणे-६ अंतर्गत


अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७.

फोन नबंर :- ०२० ९७०००५६/५७

**Email : chesthospital@ymail.com**


website : mahatenders.gov.in

Tender for supply of

# अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ येथील आहार सेवा कंत्राटी पध्दतीने देण्याचा निविदा फॉर्म

---

## Not Transferable

निविदा संदर्भ/अधिक्षक/आहारसेवा/निविदा/११७७/२०१८ दि.१३.१२.२०१८.

| | |
|---|---|
| निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- | दि.२०/१२/२०१८ रोजी सकाळी १०.०० ते दि.०२/०१/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| ई-निविदा ऑनलाईन दाखल करण्याचा कालावधी : | दि.२०/१२/२०१८ रोजी सकाळी १०.०० ते दि.०२/०१/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |

निविदा संदर्भ/पुउरुपु/कंत्राटीआहारसेवा/ई-निविदा/११७७/२०१८

मा.सहसंचालक, आरोग्य सेवा(क्षय व कुष्ठ) येरवडा, पुणे-६ यांच्या अधिनस्त अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ हे या आरोग्य संस्थेमध्ये कंत्राटी सेवा पुरविणेकरीता दोन लिफाफा पध्दतीने पात्र व इच्छुक निविदा धारकांकडून निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | कालावधी | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय,औंध पुणे-२७ या रुग्णालयातील दाखल क्षय आंतररुग्णांना आहार पुरविण्याची कंत्राटी सेवा. | निविदा मंजूर झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष कालावधीकरीता | रु.५०,०००/- ऑनलाईन भरावी. |

वरील सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविण्याकरीता मान्यता प्राप्त व इच्छूक कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. नियम व अटीच्या पुर्ततेसह आपली निविदा mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दि.२०/१२/२०१८ ते ०२/०१/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) किंवा त्यापुर्वी डाऊनलोड करावयाचे आहेत. निविदा शुल्क रक्कम रुपये ३०००/- हि ऑनलाईन भरावी. तसेचे ॲफिडेव्हीट (प्रपत्र ४) व मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र, प्रपत्र-१, अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ यांचे कार्यालयात दिनांक ०२/०१/२०१९ पर्यंत सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यत जमा करण्यात यावेत. सदर निविदा प्रक्रियेचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

| Name of Tender | Period of Download & Upload Tender Form/Bid | Closing of Bid | Date of Sbmission | Bid Opening |
|---|---|---|---|---|
| आहार सेवा | २०/१२/२०१८ ते सकाळी १०.०० ते ०२/०१/२०१९ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ०२/०१/२०१९ वेळ सायंकाळी ५.०० वाजता | २०/१२/२०१८ ते सकाळी १०.०० ते ०२/०१/२०१९ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | दिनांक ०४/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता. |

वरील निविदा mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरावयाच्या आहेत.

पात्रतेचे निकषः-

- निविदाधारकाची मागील तीन आर्थिक वर्षाची वार्षिक उलाढाल रक्कम रुपये ५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास निवीदाधारक पात्र ठरु शकतात.(आर्थिक वर्ष सन २०१५-१६, सन २०१६-१७ सन २०१७-१८)
- संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.
- फुड ॲन्ड ड्रग विभागाचे (महाराष्ट्र शासनाचे) नोंदणी प्रमाणपत्र.
- निविदाधारकाने मागील तीन आर्थिक वर्षाचे सन २०१५-१६, सन २०१६-१७ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केलेली उलाढाल चार्टड अकौंटंट कडून प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.
- सर्व्हिस टॅक्सचे नोंदणी प्रमाणपत्र
- सर्व्हिस टॅक्सची मागील तीन आर्थिक वर्षाची भरलेली चलने.
- मागील तीन आर्थिक वर्षात निवीदाधारकाने शासकिय/निमशासकिय संस्थेत आहार सेवा समाधानकारक पुरविल्याबाबत पूर्वानुभवाची तपशिलवार माहिती दयावी.(प्रपत्र-२ प्रमाणे) सेवा पुरविण्याकरीता देण्यात आलेल्या आदेशाच्या सत्यप्रती)
- वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन नंबर)
- आयकर विवरणपत्र दाखल केलेबाबत ITR- (मागील तीन आर्थिक वर्षाचे)
- मागील तीन आर्थिक वर्षात आयकर भरलेली चलने.
- व्यवसायकर भरल्याचे नोंदणी प्रमाणपत्र व चलन.
- महाराष्ट्र कामगार कल्याण बोर्ड यांचे नोंदणी प्रमाणपत्र.
- रुपये पाच लाख रुपये ची राष्ट्रीयकृत/शेडयुल/जिल्हा बॅंकेचे मूळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र निविदाधारकाने कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. निविदाधारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र.
- निविदाधारकाने शासनाच्या कोणत्याही विभागातर्फे काळया यादीत टाकलेले नाही याबाबत निवीदाधारकाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-४ ॲफेडेव्हिट करुन)
- सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थांना निवीदा भरावयाची असल्याची त्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्थेस बयाना रक्कम माफ असलेस त्याबद्दल सक्षम प्राधिकाऱ्याचे परिपत्रक जोडावे व संबंधित विभागाचे निवीदा भरणाऱ्या संस्थेच्या नावाचा उल्लेख असलेले बयाना रक्कम माफ करणेविषयी अद्यावत प्रमाणपत्र जोडावे.
- कंत्राटदाराकडून नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनानुसार (लेबर ॲक्ट नुसार) त्यांचे वेतन अदा करणे बंधन कारक राहील.
- शासकिय/निमशासकिय/खाजगी संस्थांमधे आहार सेवा पुरवठा केलेला ठेकेदार पात्र ठरु शकतात.
- काही तांत्रिक अडचणी मुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ यांनी राखून ठेवलेला आहे.
- वित्त विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१९ ऑगष्ठ २०१७ अन्वये निविदा सादर करताना दि.१ जुलै २०१७ नंतर लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोजाचा विचार करुनच निविदा सादर करण्यात यावी.
- 

टिपः- निविदाधारकावर दखलपात्र गुन्हा नसावा तसेच निविदाधारक यापुर्वी सदरची सेवा देत असताना सेवा घेणाऱ्या संस्थेकडून निविदाधारकांवर अव्यवहार्य सेवा दिल्याबद्दल या कार्यालयाच्या निदर्शनास आलेस अथवा निविदाधारक शासकिय अथवा निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत समाविष्ट असल्यास सदरची निविदा असेल त्या स्तरावर रद्द करण्यात येईल.

(डॉ.श्रीमती एन.जी.ढवळे)
अधिक्षक
पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७.

निविदा भरताना निवीदाधारकांस येणाऱ्या खर्चाबाबतः- निविदा सादर करताना येणाऱ्या सर्व खर्चाची संपुर्ण जबाबदारी ही निविदा धारकावर असेल याबाबत निविदाधारकास प्रतिपूर्ती हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरची निवीदा प्रक्रिया रद्द झाली अथवा निविदाधारकाची निविदा नामंजूर केली गेल्यास सदरच्या निविदेकरीता झालेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरणः- निविदा प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधित निवीदाधारकाने अथवा निविदा भरु इच्छिणाऱ्या निवीदाधारकांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेच्या १० दिवस पूर्वी या कार्यालयाकडे लेखी अथवा ई मेल व्दारा सादर करावी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर सदरच्या तक्रारी अथवा शंका विचारात घेतल्या जाणार नाही.

कार्यालयाचा पत्ताः- अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-४११०२७
ई मेल - **chesthospital@ymail.com**

निविदा प्रक्रियेतील बदलाबाबतः-

- सक्षम प्राधिकारी हे निविदेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास सदरच्या निविदेच्या अंतिम दिनांकाच्या वेळेपूर्वी शुध्दीपत्रकाद्वारे बदल करु शकतात.
- शुध्दीपत्रकाद्वारे निविदेमधील बदल हे ग्राहय मानले जातील व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहतील.
- प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकामुळे निविदा सादर करण्यास अतिरिक्त कालावधी वाढविण्याच्या हक्क सक्षम प्राधिकाऱ्याने राखून ठेवलेला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावरुन प्रसिध्द केली जाईल व ती माहिती भरु इच्छिणाऱ्यांना लागू होईल.

निविदा सादर करणेबाबतः- निविदा हया विहीत मुदतीत दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्र.१ तांत्रिक लखोटा व लखोटा क्र.२ व्यापारी लखोटा. अपूर्ण लखोटा सादर केल्यास अथवा आवश्यक कागदपत्रांची पुर्तता नसलेली निविदा नामंजूर करण्यात येईल.

उशिरा प्राप्त झालेल्या निविदांबाबतः- उशिरा प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यात येतील तसेच उशिरा सादर केलेल्या निविदांबाबतचे कोणतेही कारण ग्राहय मानले जाणार नाही. उदा. ईलेक्ट्रीसिटी/इंटरनेट/इत्यादी याबाबत निविदाधारकास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
लखोटा क्र.१ तांत्रिक लखोटाः- तांत्रिक लखोटया मध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

- निविदाधारकांना बयाना रक्कम ऑनलाईन भरावी. तसेच मुळ बॅक गॅरंटी निविदेसह प्रपत्र ६ नुसार सादर करावी
- संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.
- फुड ॲन्ड ड्रग विभागाचे (महाराष्ट्र शासनाचे) नोंदणी प्रमाणपत्र.

- निविदाधारकाने मागील तीन आर्थिक वर्षांचे सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केलेली उलाढाल चार्टड अकौंटंट कडून प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.
- सर्व्हिस टॅक्सचे नोंदणी प्रमाणपत्र.
- सर्व्हिस टॅक्सची मागील तीन आर्थिक वर्षांची भरलेली चलने.
- मागील तीन आर्थिक वर्षांत निवीदाधारकाने शासकिय/निमशासकिय संस्थेत आहार सेवा समाधानकारक पुरविल्याबाबत पूर्वानुभवाची तपशिलवार माहिती दयावी.(प्रपत्र-२ प्रमाणे) सेवा पुरविण्याकरीता देण्यात आलेल्या आदेशाच्या सत्यप्रती)
- वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन नंबर)
- आयकर विवरणपत्र दाखल केलेबाबत ITR- (मागील तीन आर्थिक वर्षाचे)
- मागील तीन आर्थिक वर्षात आयकर भरलेली चलने.
- व्यवसायकर भरल्याचे नोंदणी प्रमाणपत्र व चलन.
- महाराष्ट्र कामगार कल्याण बोर्ड यांचे नोंदणी प्रमाणपत्र.
- रुपये पाच लाखाची राष्ट्रीयकृत/शेडयुल/जिल्हा बॅंकेचे मूळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र निविदाधारकाने कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
- निविदाधारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र अथवा रु. १००/- चे स्टॅंपपेपरवर निविदा धारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे प्रतिज्ञापत्र नोटरी करुन सादर करावे.
- निविदाधारकाने शासनाच्या कोणत्याही विभागातर्फे काळया यादीत टाकलेले नाही याबाबत निविदाधारकाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.(प्रपत्र-४ ॲफेडेव्हिट करुन)
- सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थांना निविदा भरावयाची असल्याची त्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्थेस बयाना रक्कम माफ असलेस त्याबद्दल सक्षम प्राधिकाऱ्याचे परिपत्रक जोडावे व संबंधित विभागाचे निविदा भरणाऱ्या संस्थेच्या नावाचा उल्लेख असलेले बयाना रक्कम माफ करणेविषयी अद्यावत प्रमाणपत्र जोडावे.

व्यापारी लखोटाः- व्यापारी लखोटा सादर करणे बंधनकारक आहे.

१) निविदेतील प्रपत्र क्र. ५ वर दर निश्चित करावे (ऑनलाईन पध्दतीने)

निविदा सादर करणेविषयी अंतिम तारीख :- निविदा धारकाने परिपूर्ण निविदा विहीत कालावधीत संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावयाचे आहे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने सादर करावयाचा कालावधी शुध्दीपत्रकाद्वारे वाढविला असल्यास अथवा बदल केला असल्यास, बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पुर्वीच्या निविदेतील सर्व अटी शर्ती त्यास लागू रहातील.

लखोटा क्र १ तांत्रिक लखोटा उघडण्याबाबतः-

लखोटा क्र १. तांत्रिक लखोटा हा गठीत केलेल्या समिती समोर उघडण्यात येईल. तसेच निविदाधारकांनाही आमंत्रित केले जाईल. जर निविदाधारक उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी आपला अधिकृत प्रतिनिधी उपस्थित रहात असलेबाबत या कार्यालयास पत्र दयावे. जर निविदाधारक किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत तर त्यांना सदर प्रक्रियेबाबत तक्रार करता येणार नाही.

लखोटा क्र.१. मधील सर्व कागदपत्रांची समितीमार्फत तपासणी केली जाईल. तसेच समितीने घेतलेला निर्णय अथवा अटी व शर्ती केल्यास त्या निविदाधारकांना बंधनकारक रहातील. तसेच याबाबतचे पूर्ण अधिकार समितीस असतील. याबाबत निविदाधारकांना तक्रार करता येणार नाही.

सदरची निविदा प्रक्रिया हि दोन लिफाफा पध्दतीने आहे. लखोटा क्र.१ तांत्रिक लखोटयाची छाननी झाल्यानंतर स्पर्धेकरीता लखोटा क्र १ चे कमीत कमी तीन लखोटे पात्र ठरले तरच सदर दिवशी लखोटा क्र.२. (व्यापारी लखोटा) उघडला जाईल अथवा लखोटा क्र. १ पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी (कार्यालयास आवश्यक वाटल्यास) चार्टड अकाऊटंट यांचे कडून करुन घेऊन लखोटा क्र.२ (व्यापारी लखोटा) ऑनलाईन उघडण्यत येईल. तांत्रिक लखोटया मधील मागणी केलेली सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. अपूर्ण कागदपत्रांचा लखोटा अथवा चुकीची कागदपत्रे सादर केलेला लखोटा नामंजूर करण्यात येईल व याबाबत ठेकेदारांना तक्रार करता येणार नाही.

निविदेचा वैध कालावधी :- निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लखोटा उघडल्यापासून नव्वद दिवसांकरीता ग्राहय मानला जाईल. नव्वद दिवसांपेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा रद्द करण्यात येतील. सदरचा वैधता कालावधी या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व परस्परांच्या संमतीने वाढविला जाईल तो निविदाधारकास बंधनकारक राहील.

बयाणा रक्कम :- बयाना रक्कम रु.५००००/- नेट बॅकिंग व कोरी टेंडर फॉर्म फी रु.३०००/- नेट बॅकिंग पध्दतीने स्विकारली जाईल. नामंजुर करण्यात आलेल्या निविदा धारकांची बयाना रक्कम ३० दिवसांचे आत ऑनलाईन परत होईल. तसेच निविदाधारकांना बयाना रक्कमेचे कोणतेही व्याज दिले जाणार नाही अथवा व्याजाची मागणी करता येणार नाही.

बयाना रक्कम जप्त करणेबाबत :-

- निविदाधारक आपली वैधता कालावधीमध्ये पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कार्यालयास याबाबत निविदाधारकानी लेखी कळविले गेल्यास.
- ठेव निश्चित केलेल्या निविदाधारकांने १००/- रुपयाचे स्टॅंप पेपरवर करारपत्र करुन न दिल्यास.
- निविदा स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार केल्यास.

- निविदा किंवा प्रस्ताव स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरल्यास.
- निविदा दस्ताऐवजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटीची पुर्तता न केल्यास कार्यालयाकडे जमा केलेली बयाना रक्कम रक्कम जप्त केली जाईल व त्याबाबत निविदाधारकास तक्रार करता येणार नाही.

निविदेचे मूल्यमापनः-

- गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत तांत्रिक लखोटयातील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.
- निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष निविदाधारकांची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याबाबतची क्षमता याबाबतची छाननी निविदाधारकाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.
- निविदाधारकांकडून निविदा सादर करताना गफला केला आहे अथवा सादर केलेल्या निविदा निविदाधारकांशी परस्परांच्या संगनमताने सादर केलेल्या आहेत का१ याची शहानिशा समितीमार्फत केली जाईल.
- निविदा धारकांची निविदा परिपूर्ण असणे आवश्यक आहेत. अपूर्ण कागदपत्रांच्या निविदा नामंजूर करण्यात येतील व सदरच्या निविदांचा व्यापारी लखोटा फोडण्यात येणार नाही. तसे निविदाधारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहू शकतात.
- ज्या निविदाधारकांचा तांत्रिक लखोटा परिपूर्ण असेल तेच निविदाधारक लखोटा क्र. २ (व्यापारी लखोटा) फोडण्यास पात्र ठरतील. पात्र ठरलेल्या निविदाधारकांना लखोटा क्र.२ फोडण्याबाबत वेळ व दिनांक कळविला जाईल. अथवा सदर निविदेस स्पर्धा होत असल्यास निविदेमधील अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार समितीस राहिल. याबाबत निविदाधारकांस तक्रार करता येणार नाही.
- निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांची तपासणी मुल्यमापनाचे आवश्यक ते निकष लावतील व ते सर्व निकष निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.
- सादर केलेल्या निविदेमधिल कागदपत्रांच्या एका निविदाधारकाने दुसऱ्या निविदाधारकाच्या कागदपत्राबाबत शंका उपस्थित केल्यास सदरचे कागदपत्रांची तपासणी करणेकरीता तक्रारदार निविदाधारकाने प्रशासकिय अधिकारी, अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय औंध, पुणे यांच्या नावाने रु.५००००/- (रु.पन्नास हजार) चा धनादेश दयावा लागेल. सदरचे तक्रारीत तथ्य आढळुन आल्यास रक्कम तक्रारदारास परत करण्यात येईल. तक्रारीत तथ्या आढळून न आल्यास सदरची रक्कम तक्रारदारास परत देण्यात येणार नाही. रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल.

सुरक्षा अनामतः-

- ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्या निविदाधारकाने सुरक्षा अनामत रक्कमेची बॅक गॅरंटी कार्यालयाकडे ३० दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक

राहिल. बँक गॅरंटी प्रपत्र-७ नुसार सादर करावी लागेल. अनामत रक्कम हि निविदाधारकाने कार्यालयास सादर केलेल्या एकुण दराच्या ३ टक्के इतकी असेल. तसेच निविदाधारकाने रु १००/- च्या स्टॅंप पेपरवर करार करुन देणे बंधनकारक आहे.

- कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्याने व्यवस्थितरित्या पूर्ण केला नसल्यास अथवा संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई आणि नुकसान भरपाई करणे आवश्यक असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने संबंधित ठेकेदाराची सेवा योग्य नसल्यास कळविल्यास संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

निविदेच्या गोपनियतेबाबतः- निविदाधारकांने सादर केलेल्या कागदपत्रे तपासणी झालेनंतर, सदर बाबतीत स्पष्टीकरण व दरांचा तुलनात्मक तक्ता, समितीच्या शिफारशी तसेच निविदाधारकांस अथवा जे निविदा प्रक्रियेबाबतची माहिती निविदाधारकांस अथवा जे निविदा प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत, अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही.

भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवेबाबतः- भ्रष्ट,फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त आरोप असलेले व सदरची माहिती या कार्यालयापासून लपवून ठेवल्याचे निदर्शनास आलेस आपली निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

रुग्णालयीन आहार सेवा व कामाची व्याप्ती व स्वरुपः- कंत्राटदाराने रुग्णालयाच्या पाकगृहात अन्न शिजवणे बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| सकाळी ६ वाजता चहा | चहा प्रती रुग्णास एक कप (१५०मि.ली.) |
| सकाळी ९ वाजता नाश्ता | दूध १५० मि.ली.<br>पोहे.१०० ग्रॅम अथवा उपमा ५० ग्रॅम अथवा ब्रेड व उसळ ५० ग्रॅम.<br>केळी २ नग., शेंगदाणा लाडू १ नग - ७० ग्रॅम, उकडलेले अंडे १ नग. |
| दुपारी १२.०० जेवण. | १) गव्हाची चपाती २ नग.<br>२) तुरीच्या / मुगाचे डाळीचे वरण १ वाटी,<br>भात - १ वाटी.<br>३) भाजी - फळभाजी/ पालेभाजी / कांदाभाजी<br>यापैकी एक १२५ ग्रॅम.<br>४) उसळ - मटकी / वाटाणा /चवळी /हरबरा<br>यापैकी एक ३० ग्रॅम. |
| सायंकाळी ३.०० वाजता | चहा- १ कप ( १५० मि.ली.प्रति रुग्ण.) |
| रात्रिचे जेवण ७ वाजता | १) गव्हाची चपाती २ नग.<br>२) तुरीच्या / मुगाचे डाळीचे वरण १ वाटी, भात - १ वाटी.<br>३) भाजी - फळभाजी/ पालेभाजी / कंदभाजी<br>यापैकी एक १२५ ग्रॅम.<br>४) उसळ - मटकी / वाटाणा /चवळी /हरबरा<br>यापैकी एक ३० ग्रॅम. |
| एकूण उष्मांक | २५०० कॅलरीज. |
| प्रथिने | ९५ ग्रॅम |
| टिप | भात १ वाटी, ५० ग्रॅम तांदूळ. डाळ १ वाटी, ३५ ग्रॅम डाळ, १ चपाती ५० ग्रॅम पीठ, पालेभाजी, फळभाजी, कंदभाजी.<br>नाश्ता- ब्रेड अधिक उसळ/उपमा/पोहे.<br>चहा- दूध २५ मि.ली.,साखर १२.५ ग्रॅम, चहापत्ती २.५ ग्रॅम.<br>शेंगदाणा लाडू- शेंगदाणे ४० ग्रॅम, गूळ ३० ग्रॅम. |

रुग्णालयात कंत्राटदारांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधाः-

- स्वयंपाकासाठी लागणारे गॅस, बर्नर, कुकर, रिकामे गॅस सिलेंडर , रेफ्रिजरेटर, मिक्सर रुग्णालयामध्ये उपलब्ध असून त्याचा वापर करतांना सुरक्षा व देखभाल व दुरुस्ती करणे ठेकेदाराची जबाबदारी राहील. अथवा ठेकेदारास वरील साहित्याची व्यवस्था करावी लागेल.
- स्वयंपाकासाठी व भोजनकक्षामधील विद्युत उपकरणांचा आवश्यकतेप्रमाणे वापर केल्यास त्यासाठी खर्च होणा-या विजेचे नियमानुसार आकारण्यात येणारे बील संबंधित ठेकेदारास अदा करावे लागेल.
- स्वयंपाकासाठी लागणारे ३२ गॅस सिलेंडर रुग्णालयात आहेत. ते भरुन आणण्याचा खर्च ठेकेदारास करावा लागेल. तसेच व याव्यतिरीक्त साहित्य ठेकेदारास स्वतः आणावे लागेल.

आहार सेवेचे सनियंत्रणः-

- डॉक्टरांच्या सल्ल्याने काही रुग्णांना विशिष्ठ प्रकारचा आहार सांगितला तर तो द्यावा लागेल.
- जेवण तयार झाल्यानंतर ते रुग्णालयातील निश्चित केलेल्या वैद्यकिय अधिकारी तसेच अधिक्षक, प्रशासकिय अधिकारी, कार्यालयीन अधिक्षक, परिसेविका यांना दाखवूनच नंतर रुग्णांना जेवण द्यावे लागेल.
- स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांची वैद्यकिय तपासणी दर तीन महिन्यांनी करण्याबाबत कंत्राटदार बांधील राहिल. व त्याची खातरजमा करण्यात येईल व तसे नोंदवहीत नमूद करण्यात येईल.
- रुग्णांना प्रत्येक वॉर्डात आहार वितरीत करणे बंधनकारक राहील.
- ३ महिन्यातून एकदा जिल्हा व्यवस्थापन समिती आहार सेवेचा आढावा सभा घेतील.
- आहार तज्ञ, पाकगृह पर्यवेक्षक आवश्यक त्या सुचना आहाराच्या बाबतीत लेखी स्वरुपात देतील.

<u>कंत्राटदाराच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये:-</u>

- स्वयंपाकघरात व भोजनकक्षात जे कर्मचारी लागतील त्याचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.
- स्वयंपाकघरासाठी लागणारे अन्नधान्य, तेल, व इतर पदार्थ चांगल्या प्रतीचे, ॲगमार्क व आय. एस. आय.मार्कच्या असावेत. त्याबाबत वापरण्यात येणारे साहित्य प्रशासकास दाखवून ते वापरण्यास मान्यता घ्यावी लागेल.
- कंत्राटदाराने सर्व खाद्यवस्तू (कच्चा) स्वच्छ केलेल्याच वापराव्यात. या कच्च्या खाद्य वस्तूंच्या दर्जाची तपासणी रुग्णालयीन अधिकारी अचानकपणे करतील व महिन्यातून एकदा यापैकी काही खाद्य वस्तुंचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यांत येतील.
- भाजीपाला, फळभाज्या ताज्या व चांगल्या प्रतीच्या वापराव्या लागतीत. डॉक्टरांच्या सल्ल्याने काही रुग्णांना विशिष्ठ प्रकारचा आहार सांगितला तर तो द्यावा लागेल.

- जेवण तयार झाल्यानंतर ते रुग्णालयातील निश्चित केलेल्या वैद्यकिय अधिकारी तसेच अधिक्षक, प्रशासकिय अधिकारी, कार्यालयीन अधिक्षक, परिसेविका यांना दाखवूनच नंतर रुग्णांना जेवण द्यावे लागेल.
- स्वयंपाक करणा-या व अन्न हाताळणा-या कर्मचा-यांना कंत्राटदार गणवेश देतील.
- स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांची वैद्यकिय तपासणी दर तीन महिन्यांनी करण्याबाबत कंत्राटदार बांधील राहिल.
- स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांच्या स्वच्छतेची (हायजीनची) जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

ठेकेदारांस दयावयाचा मोबदला व वेतन अदा करणेबाबतः-

शासकिय अनुदान उपलब्धतेनुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल यदा कदाचित शासकिय अनुदान वेळेवर उपलब्ध न झाल्यास आपणास विलंबाने देयकाची रक्कम अदा होईल. अशा परिस्थितीत ठेकेदारास उशीरा देयकाची रक्कम मिळाल्याबद्दल देयक रकमेवर व्याज दिले जाणार नाही. ठेकेदारास उशीरा देयकाची रक्कम प्राप्त झाली तरी त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन दरमहा ७ तारखेच्या आत किमान वेतन कायद्यानुसार देण्याचे त्यांचेवर बंधनकारक राहील व आपल्या सेवेबाबत वेळोवेळी अधिक्षक, यांचेशी समक्ष भेटून चर्चा करावी. संबधित कंत्राटी कामगारांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ त्यांना अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना शासन सेवेत कोणतेही हक्क राहणार नाहीत.

आहार पुरवठा संबंधी निविदेच्या अटी व शर्ती.

पुणे उरो रुग्णालयात अंदाजे ९० ते १०० क्षय आंतररुग्ण असतात. या रुग्णांना दररोज सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे जेवण, सायंकाळी ३ वाजता चहा व रात्रीचे जेवण असे दयावयाचे आहे. अटी व शर्तीचा तपशील पुढील प्रमाणेः

- निविदाधारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत्येक प्रपत्रावर त्याची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.
- ज्या निविदाधारकांनी अर्ज डाऊनलोड केला असेल त्यांनाच तो भरता येईल.
- संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना शासकिय सेवेत कोणतेही हक्क राहणार नाहीत याबाबत ठेकेदाराने संबंधित कर्मचाऱ्यांना पूर्वकल्पना दयावी. या बाबत कोणतेही वाद निर्माण होणार नाहीत याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.
- कामावर असताना कोणतीही दुर्घटना झाल्यास व कंत्राटी कर्मचाऱ्यास दुखापत झाल्यास सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी, अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्या अनुषंगाने नियमानुसार योग्य तो इन्शुरन्स करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत हे रुग्णालय अथवा शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

- रुग्णालयातील आंतररुग्ण कक्षामधील रुग्णांच्या संख्येनुसार चहा,नाष्टा,जेवण द्यावयाचे आहे. रुग्णांकरीता तयार करण्यांत येणारे भोजन, चहा, नाष्टा इ.रुग्णालयात असणा-या स्वयंपाकगृहात तयार करण्यांत यावा.
- रुग्णांना प्रत्येक वॉर्डात आहार वितरीत करणे बंधनकारक राहील.
- स्वयंपाकासाठी लागणारे गॅस, बर्नर, कुकर, रिकामे गॅस सिलेंडर , रेफ्रिजरेटर, मिक्सर रुग्णालयामध्ये उपलब्ध असून त्याचा वापर करताना सुरक्षा व देखभाल व दुरुस्ती करणे ठेकेदाराची जबाबदारी राहील. अथवा ठेकेदारास वरील साहित्याची व्यवस्था करावी लागेल.
- स्वयंपाकासाठी विद्युत उपकरणांचा आवश्यकतेप्रमाणे वापर केल्यास यासाठी खर्च होणा-या विजेचे नियमानुसार आकारण्यात येणारे बील संबंधित ठेकेदारास अदा करावे लागेल.
- स्वयंपाकघरात जे कर्मचारी लागतील त्याचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.
- स्वयंपाकघरासाठी लागणारे अन्नधान्य, तेल, व इतर पदार्थ चांगल्या प्रतीचे, ॲगमार्क व आय. एस. आय.मार्कच्या असावेत. त्याबाबत वापरण्यात येणारे साहित्य आहारतज्ञास दाखवून ते वापरण्यास मान्यता घ्यावी लागेल.
- कंत्राटदाराने सर्व खाद्यवस्तू (कच्चा) स्वच्छ केलेल्याच वापराव्यात या कच्च्या खाद्य वस्तूंच्या दर्जाची तपासणी आहारतज्ञ दैनंदिन करतील व महिन्यातून एकदा यापैकी काही खाद्य वस्तुंचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यांत येतील.
- सर्व रुग्णांसाठी प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्यदिन, तसेच सणासुदीसही गोड जेवण द्यावे लागेल. यात बुंदी लाडू, जिलेबी, गुलाबजामुन, शिरा यापैकी एकाचा समावेश असावा.
- डॉक्टरांच्या सल्ल्याने काही रुग्णांना विशिष्ट प्रकारचा आहार सांगितला तर तो द्यावा लागेल.
- जेवण तयार झाल्यानंतर ते रुग्णालयातील निश्चित केलेल्या वैद्यकिय अधिका-यांना तसेच अधिक्षक, प्रशासकिय अधिकारी, कार्यालयीन अधिक्षक, परिसेविका यांना दाखवूनच नंतर रुग्णांना जेवण द्यावे लागेल.
- स्वयंपाकासाठी लागणारे ३२ गॅस सिलेंडर रुग्णालयात आहेत. ते भरुन आणण्याचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.
- स्वयंपाक करणा-या व अन्न हाताळणा-या कर्मचा-यांना गणवेश कंत्राटदार देतील.
- स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांची वैद्यकिय तपासणी दर तीन महिन्यांनी करण्याबाबत कंत्राटदार बांधील राहिल.
- स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांच्या स्वच्छतेची (हायजीनची) जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
- निविदा धारकांनी वरील सर्व अटी आणि शर्तीच्या अधीन राहून एका रुग्णाकरीता प्रतिदिनी वर नमूद केलेल्या प्रमाणकानुसार दोन वेळचे जेवण,नाष्टा, चहा करीता दर नमूद करावेत.
- मंजूर निविदा धारकाने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील. निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास ठेकेदारास १ महिन्याची नोटीस देवून कंत्राट रद्द करण्यात येईल आणि मंजूर

निविदाधारकाचे नाव काळया यादीत घालून बयाना, अनामत रक्कम जप्त करणेबाबतची कडक कार्यवाही करण्यात येईल. त्याचबरोबर नियमित पुरवठया दरम्यान होणाऱ्या चुका/हयगयीस अनुसरुन योग्य त्या दंडाच्या रक्कमेची वसुली देयकातुन करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

- एकदा भरलेली निविदा रद्द केली जाणार नाही. तसे झाल्यास संबंधिताचे नाव काळया यादीत घातले जाईल.
- निविदा नामंजूर झाल्याचे कळविण्यात येणार नाही.
- निविदा पत्रात कोणत्याही प्रकारची खाडाखोड चालणार नाही.
- आपल्या कामाची गुणवत्ता पडताळणीचा अंतिम अधिकार अधिक्षक यांचाच राहील. आपले काम असमाधानकारक दिसून आल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत निविदाधारकांस न्यायालयात जाण्याचा अधिकार राहणार नाही.
- शासकिय अनुदान उपलब्धतेनुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल. यदा कदाचित शासकिय अनुदान वेळेवर उपलब्ध न झाल्यास आपणास विलंबाने देयकाची रक्कम अदा होईल. अशा परिस्थितीत ठेकेदारास उशीरा देयकाची रक्कम मिळाल्याबद्दल देयक रकमेवर व्याज दिले जाणार नाही. नियमानुसार देयकातुन टि.डी.एस.कपात करण्यात येईल. ठेकेदारास उशीरा देयकाची रक्कम प्राप्त झाली तरी त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन दरमहा ७ तारखेच्या आत किमान वेतन कायद्यानुसार देण्याचे त्यांचेवर बंधनकारक राहील.
- निविदाधारकास रु.५०,०००/- बयाना रक्कम सुरक्षा ठेव म्हणून नेट बॅंकीग पध्दतीने किंवा धनाकर्षाने स्विकारली जाईल.
- पुरवठाधारकाकडून / निविदा धारकाकडून दोन लिफाफा पध्दतीने (१) तांत्रिक लिफाफा, (२) व्यापारी लिफाफा मागविणेत येत आहेत. निविदा भरताना निविदेतील तांत्रीक अर्हता अर्जासोबत पूर्ण करीत असल्याची खात्री केल्यानंतरच निविदा धारकाने निविदा अर्ज भरावा. एका व्यक्तीस त्यांचे नावे एकच निविदा भरता येइल/अर्ज विकत घेता येईल.
- निविदा सादर करते वेळी मोहरबंद लिफाफयावर डाव्या बाजूस १.तांत्रीक लिफाफा, बंद लिफाफा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावा.
- प्रत्येक लिफाफयावर अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय,औंध, पुण-२७ येथे आहार पुरवठा बाब निविदा असे लिहावे. निविदा पोस्टाने स्विकारली जाणार नाही. लिफाफा नं.१ मध्ये दर्शविलेली प्रमाणपत्रे सादर करावयाची आहेत. कागदपत्रे अपुर्ण असल्यास लिफाफा क्र.२ (व्यापारी) उघडण्यात येणार नाही. केंद्र, राज्य, निमशासकिय कर्मचा-यास अथवा त्याचे कुटुंबातील नातेवाईकास निविदा अर्ज भरता येणार नाही.
- ज्या व्यक्तीने अर्ज घेतला असेल, त्यांनाच तो भरता येईल. इतरांना नाही.
- निविदा अर्जासोबत निविदा धारकाने आयकराचा पॅन नंबर नमूद करावा.
- निविदा धारकाने अर्ज करताना महसूल अधिका-याकडून प्राप्त केलेली स्वतःच्या नावाची रु.५,००,०००/- (रु.पाच लाख फक्त) हैसियत (ऐपत) प्रमाणपत्र जोडावे किंवा रु.५,००,०००/- ऐपत दर्शविणा-या जामिनदाराचे / बॅंकेचे प्रमाणपत्र रु.१००/- च्या जनरल स्टॅम्पवर लिहून देणे आवश्यक आहे. सुशिक्षित बेरोजगार स्वयंरोजगार सहकारी

संस्था यांनी बयाणा, अनामत रक्कमेत सूट मागावयांची असल्यांस तालुका अथवा जिल्हयांच्या निबंधकांकडून त्यां संस्थेचे नांवानिशी अनुमती प्राप्त पत्र सोबत जोडावे.

- मागासवर्गीय संस्था / अपंग संस्था यांना बयाणा, अनामत रक्कमेत सूट मागावयांची असल्यांस संस्थेच्या नांवानिशी शासन निर्णयांची प्रत जोडणेत यावी.
- मंजूर निविदा धारकाची पुरवठयाच्या देयकाची रक्कम अदा करताना प्रचलित नियमाप्रमाणे देयकामधून आयकर/टिडीएस कपात करुन उर्वरित रक्कम CMP /धनादेशाने अदा करण्यात येईल.
- एकदा ऑनलाईन निश्चित झालेले दर पुन्हा वाढविता येणार नाहीत.
- निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकाने आवश्यक तो करारनामा आदेश घेण्यापूर्वी नियमानुसार रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये करावा लागेल.
- निविदा उघडण्याचे वेळी तीन निविदाधारकांचे योग्य तांत्रिक लिफाफे असल्याशिवाय व पुर्ण कागदपत्रे असल्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडता येणार नाही.
- मंजूर निविदेची मुदत निविदा मंजूर झालेल्या तारखेपासून १ (एक) वर्षाची राहील. सदर कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार कमाल २ महिनेपर्यंत किंवा पुढील नविन निविदा अस्तित्वात येईपर्यंत त्याच दराने आहारसेवा पुरवावी लागेल.
- ऑनलाईन/सिलबंद निविदा दिनांक २०/१२/२०१८ रोजी सकाळी १०.०० पासून दि.०२ /०१/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. पोस्टाने पाठविलेल्या निविदा फॉर्म स्विकारले जाणार नाहीत. पोस्टाने माहिती, निविदा फॉर्म पाठविले जाणार नाहीत.
- ऑनलाईन/सिलबंद तांत्रिक लिफाफा क्र. १ हा दिनांक ०३/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० नंतर शक्य असल्यास उघडण्यात येईल. पुरवठादारास किंवा त्याचे अधिकृत एका प्रतिनिधीस निविदा उघडतेवेळी उपस्थित राहता येईल. निविदाधारक किंवा प्रतिनिधी अनुपस्थित राहिले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच निविदा उघडणेचे तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे अधिकार, अधिक्षक पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ यांनी राखून ठेवलेले आहेत.
- वित्त विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१९ ऑगष्ठ २०१७ अन्वये निविदा सादर करताना दि.१ जुलै २०१७ नंतर लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोजाचा विचार करुनच निविदा सादर करण्यात यावी.

(डॉ.श्रीमती एन.जी.ढवळे)
अधिक्षक
पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७.

प्रपत्र १

निविदा अर्ज

प्रति,
मा.अधिक्षक,
पुणे उरो रुग्णालय, औंध,
पुणे-२७

विषयः- आहार सेवा पुरविणे या कामाची निविदा अर्ज सादर करणेबाबत.

महोदया,

उपरोक्त विषयानुसार आम्ही सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासून निविदेसोबत सादर करीत आहे. (तांत्रिक लखोटयात मागणी केलेप्रमाणे). खाली सही करणार यांना निविदेतील सर्व नियम व अटी माहिती असून त्या सर्व नियम आम्हाला बंधनकारक असून त्या आम्हाला मान्य आहेत. निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचून आम्ही वरील विषयांकित सेवा पुरविणे या कामाची निविदा सादर केलेली आहे. वरील विषयांकित सेवेचा दर लखोटा क्र.२ मध्ये (ऑनलाईन पद्धतीने) सादर केलेली आहे. लखोटा क्र.२ हा निविदेचा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे.

जर खाली सही करणार यांची निविदा मंजूर झाली तर निविदेत स्पष्ट केलेप्रमाणे स्वरुप व व्याप्ती प्रमाणे तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/आम्ही बांधील राहू व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

जर खाली सही करणार यांची निविदा मंजूर करण्यात आली तर आम्हांस निविदेतील नियमाप्रमाणे देय असलेली अनामत रक्कम (निविदेधारकांने सादर केलेल्या एकूण वार्षिक दराच्या ३ टक्के)३० दिवसांत देणे आम्हांस बंधनकारक आहे. व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

आम्हांस निविदेच्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये नमूद केलेल्या दरांप्रमाणे (कामगार कायद्यांचा भंग न करता) व कामाच्या स्वरुप व व्याप्तीनुसार सेवा पुरविणेस आम्हांस बंधनकारक राहील. सदरच्या कालावधीकरीता खालील सही करणार हे सर्व नियम व अटीनुसार सेवा पुरविणेस बांधिल राहतील.

जोपर्यंत अंतिम निविदा तयार होऊन ती परस्परांच्या संमतीने कार्यान्वित होत नाही तोपर्यंत आपण (निविदा स्विकारणारे) सदरच्या प्रक्रियेस बांधिल नसून तुम्ही अन्य कोणत्याही निविदा स्विकारु अथवा नाकारु शकतात.

निविदाधारकाचा सही व शिक्का

दिनांकः-

टिपः- सदरच्या अर्जावर सही करुन डाऊनलोड केलेल्या निविदा संचासह (पान नं. १ ते    ) सही व शिक्यासोबत निविदा फॉर्म फी, बयाना रक्कम, ॲफीडिव्हीट (प्रपत्र-४) मुळ सॉलीव्हन्सी प्रमाणपत्र दि.०२.०१.२०१८ रोजी सायंकाळी ५ पर्यंत कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज उशिरा अथवा सादर न करणाऱ्या निविदा धारकांची निविदा रदद् करण्यात येईल.

**PROFORMA FOR PAST PERFORMANCE STATEMENT**
**(For a period of last 3 Years) i.e.**, F.Y. 2015-16, 2016-17 & 2017-18

सेवा देत असलेल्या संस्थेचे नाव व पत्ता.

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा घेत असलेल्या संस्थेचे नाव व पत्ता | आदेश क्र. व दिनांक | कालावधी | सेवा घेत असलेल्या संस्थेचा अभिप्राय | सेवा घेत असलेल्या संस्थेकडील शिक्का व संस्था प्रमुखाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

निविदाधारकाचा सही व शिक्का

दिनांकः-

ANNEXURE **-3**

## ANNUAL TURN OVER STATEMEMT F0R THREE YEARS

The **Annual** Turnover of M/s --------------------------------------

------------------------------------ for the past three years are given below and certified that the statement is true and correct.

| **Sr. No.** | **Year** | **Turnover Rs. in Crores** |
|---|---|---|
| 1 | 2015-16 | |
| 2 | 2016-17 | |
| 3 | 2017-18 | |

**Date:**

**Seal**

**Signature of Auditor/**
**Chartered Accountant**
**Name (in capital letters**)

# प्रपत्र-४
# ॲफिडिव्हीट

मे.कार्यकारी दंडाधिकारी सो तह....................जि...........यांचेसमोर.....
प्रतिज्ञापत्र........................................ लिहून देणार..........................वय...
.....धंदा.............
पत्ता.....................

मी सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करतो की, मी वरील पत्यावरचा कायम रहीवासी असून मा. सहसंचालक,आरोग्य सेवा,(क्षय व बीसीजी) विश्रांतवाडी, येरवडा, पुणे-६ यांच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे २७ येथे आहार सेवा पुरविण्याच्या कामाचे कोटेशन भरले असून सदरच्या कोटेशनमध्ये नमूद केलेले दर हे कामगार कायद्यानुसार कमी दर भरलेस सदरची निविदा नामंजूर करण्यात येईल तसेच मी/आम्ही नमूद केलेले दर हे शासनाकडून नियमित कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असती तर त्याला देय असणाऱ्या वेतनापेक्षा कमी असतील. सदरचे जादा दर झाल्यास माझी निविदा नामंजूर करण्यात येईल. याची मला कल्पना आहे व याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही. व सदरचे दर हे जादा असल्यास माझी निविदा नामंजूर करण्यात येईल.

मी शासकीय,निमशासकीय,खाजगी,कॉन्ट्रॅक्टरची कामे घेतली असून मी ज्या ज्या ठिकाणी कामे घेतलेली आहेत ती काम व्यवस्थितरीत्या पूर्ण केलेली आहेत.आजपर्यंत कोणतेही काम अपुरे सोडलेले नाही यामुळे अथवा इतर तक्रारींमुळे शासनाच्या कुठल्याही विभागामधे माझे नाव काळया यादीमधे नाही ही वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. माझेवर फसवणूक, अफरातफर, दंडदोष गुन्हा नोंद नाही. तसेच मला कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्हयाखाली शिक्षा झालेली नाही.

तांत्रिक लखोटयामधील (लिफाफा क्र१.)निविदेमध्ये प्रसिध्द केलेप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रे अपूर्ण अथवा चुकीची असल्यास माझी निविदा नामंजूर करण्यात येईल याची कल्पना मला आहे. व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

सदरचे प्रतिज्ञापत्र हे मी किमान वेतन कायद्याचा भंग करणार नाही तसेच मी शासनाच्या कुठलयाही काळया यादीमध्ये समाविष्ट नसलेबाबत व माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा नोंद नसलेबाबत, मा. अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे २७ यांचे कार्यालयात हजर राहणेकामी केले आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून सत्य आहे. ती खोटी ठरल्यास मी भारतीय दंड विधान संहितेतील कलम १९९,२००,व १९३ (२)नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र राहीन. म्हणून केले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट आज मु. ............

दिनांकः-

प्रपत्र-५(अ)
वार्षिक ठेव
निविदा मंजूर झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाकरीता आवश्यक असणाऱ्या वैद्यकिय सेवेवरील संभाव्य दरांचा विश्लेषनात्मक तक्ता

- अवैद्यकिय सेवेचा प्रकार :- आहार सेवा
- एकूण अपेक्षित लाभार्थी :- १२०................
- निविदाधारकाचे नाव :-............................

| अ.क्र | आहाराचा तपशिल | अपेक्षित खर्च (प्रति दिन प्रति रुग्ण) | एकूण मासिक अपेक्षित खर्च | एकूण वार्षिक अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | सकाळी ६.०० वाजता<br>चहा प्रती रुग्णास एक कप<br>(१५०मि.ली.) | रु....... | रु....... | रु......... |
| २ | सकाळी ९.०० वाजता<br>दूध १५० मि.ली.<br>पोहे.१०० ग्रॅम अथवा उपमा ५० ग्रॅम अथवा ब्रेड व उसळ ५० ग्रॅम.<br>केळी २ नग., शेंगदाणा लाडू १ नग - ७० ग्रॅम, उकडलेले अंडे १ नग. | रु....... | रु....... | रु......... |
| ३ | दुपारी १२.०० वाजता जेवण दयावे लागेल.*<br>१) गव्हाची चपाती २ नग.<br>२) तुरीच्या / मुगाचे डाळीचे वरण १ वाटी, भात - १ वाटी.<br>३) भाजी - फळभाजी/ पालेभाजी / कांदाभाजी यापैकी एक १२५ ग्रॅम.<br>४)उसळ - मटकी / वाटाणा /चवळी /हरबरा यापैकी एक ३० ग्रॅम. | रु....... | रु....... | रु......... |
| ४ | दुपारी ३.०० वाजता<br>चहा प्रती रुग्णास एक कप<br>(१५०मि.ली.) | रु....... | रु....... | रु......... |
| ५ | रात्रीचे जेवण सायंकाळी ७ वाजता<br>१) गव्हाची चपाती २ नग.<br>२) तुरीच्या / मुगाचे डाळीचे वरण १ वाटी, भात - १ वाटी.<br>३) भाजी - फळभाजी/ पालेभाजी / कंदभाजी यापैकी एक १२५ ग्रॅम.<br>४)उसळ - मटकी / वाटाणा /चवळी /हरबरा यापैकी एक ३० ग्रॅम. | रु....... | रु....... | रु......... |
| | | रु....... | रु....... | रु......... |

निविदाधारकाची सही व शिक्का नाव व पत्ता

प्रपत्र-५(ब)

वार्षिक ठेव

निविदा मंजूर झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाकरीता आवश्यक असणाऱ्या वैद्यकिय सेवा (आहार सेवा) पुरविणेकरीता सादर कलेला दरांचा तक्ता.

निविदाधारकाचे नाव........................................... ...............

| अ. क्र. | संस्थेचे नाव | एकूण अपेक्षित लाभार्थी | आहार सेवे करीता पुरविलेला दर | अपेक्षित खर्च (प्रति दिन प्रति रुग्ण) | एकूण मासिक अपेक्षित खर्च | एकूण वार्षिक अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७ | | | | | |

निवदाधारकाची सही व शिक्का
नाव व पत्ता

- **Service Tax & VAT as per Govt.rules should be paid buy tender.**

# Annexure-6

## FORMAT FOR BANK GUARANTEE FOR E.M.D

Whereas.......................... *(Hereinafter called "the Tendererr")* has submitted its tender dated..................... *(Date of submission of bid)* for the supply of............................... *(Name and/or description of the goods)* (Hereinafter called "the tender").

KNOW ALL PEOPLE by these presents that WE.................... *(Name of bank)* of................. (Name of country), having our registered office at................. *(Address of bank)* (Hereinafter called "the Bank"), are bound unto............................ *(Name of Purchaser)* (Hereinafter called "the Purchaser") in the sum of _______________________for which payment well and truly to be made to the said Purchaser, the Bank binds itself, its successors, and assigns by these presents. Sealed with the Common Seal of the said Bank this ____ day of _________ 20___

THE CONDITIONS of this obligation are:

1. If the Tenderer
   (a) withdraws its tender during the period of tender validity specified by the Tenderer in his tender; or

   (a) does not accept the correction of errors in accordance with the Instructions to tenderers; or
2. If the Tenderer, having been notified of the acceptance of its tender by the Purchaser during the period of tender validity:

   (a) Fails or refuses to execute the Contract Agreement if required; or

   (b) Fails or refuses to furnish the Security deposit, in accordance with the terms and conditions stipulated in the tender document;

we undertake to pay the Purchaser up to the above amount upon receipt of its first written demand, without the Purchaser having to substantiate its demand, provided that in its demand the Purchaser will note that the amount claimed by it is due to it, owing to the occurrence of one or both of the two conditions, specifying the occurred condition or conditions.

This guarantee will remain in force up to and including forty five (45) days after the period of the tender validity, and any demand in respect thereof should reach the Bank not later than the above date. **..................................**

**( Signature & Seal of the Bank)**

## *ANNEXURE - 7*
## SECURITY DEPOSIT FORM

To: (Name of Purchaser)

WHEREAS.................................................................. (Name of Supplier) Hereinafter called "the Supplier" has undertaken, in pursuance of Contract No................ dated, 20..... to supply..................... ................................................(Description of Diet Services) hereinafter called "the Contract".

AND WHEREAS it has been stipulated by you in the said Contract that the Supplier shall furnish you with a Bank Guarantee by a recognized bank for the sum specified therein as security for compliance with the Supplier's performance obligations in accordance with the Contract.

AND WHEREAS we have agreed to give the Supplier a Guarantee:

THEREFORE WE hereby affirm that we are Guarantors and responsible to you, on behalf of the Supplier, up to a total of................................. ...................................... (Amount of the Guarantee in Words and Figures) and we undertake to pay you, upon your first written demand declaring the Supplier to be in default under the Contract and without cavil or argument, any sum or sums within the limit of ............................... (Amount of Guarantee) as aforesaid, without your needing to prove or to show grounds or reasons for your demand or the sum specified therein.
This guarantee is valid until the ........day of..................20.......

Signature and Seal of Guarantors
.......................................
Date...............................
Address..........................
.......................................

# महाराष्ट्र शासन

अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे.
Tel. No. 020 – 29700056/57
e-mail – chesthospital@ymail.com
पत्ता- उरो रुग्णालय , औंध छावणी, पुणे-४११०२७

## निविदा सुचना

दिनांक :- १३/१२/२०१८
निविदा क्र.पुउरुपु/ई-निविदा/आहार कंत्राटी सेवा/११७७/२०१८.

अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध छावणी, पुणे-२७ येथिल १२० मंजूर खाटांनुसार क्षय आंतरुग्णांना कत्रांटी पध्दतीने, सन २०१९-२० करीता (मंजुर दिनांकापासून एक वर्षाकरीता) आहारसेवा पुरविण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| विषय | निविदा डाऊनलोड करणे | निविदापूर्व सभा | निविदा सादर करणे | निविदा बंदची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| आहार सेवा | २०/१२/२०१८ सकाळी १०.०० वा. ते०२/०१/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यंत | २८/१२/२०१८ सकाळी११.०० वाजता उरो रुग्णालय, पुणे येथे. | २०/१२/२०१८ सकाळी १०.०० वा. ते०२/०१/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यंत | ०२/०१/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यंत | ०४/०१/२०१९ सकाळी ११.०० वाजता. |

२. अधिक माहितीसाठी इच्छुक पुरवठादार यांनी https://mahatenders.gov.in आणि http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.
३. निविदा शुल्क प्रति निविदा फॉर्म रु.३०००/- हे ऑन लाईन गेटवेद्वारे निविदा विक्री कालावधी मध्ये भरावे लागतील.
४. निविदेचे वेळापत्रक https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावे.
५. अधिक्षक, पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे यांनी कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत.
६. वार्षिक मंजुर झालेल्या निविदेच्या ३ टक्के अनामत रक्कम ऑनलाईन भरणा करावी व प्रपत्र ४ व मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र सादर करावे.

(डॉ.श्रीमती एन.जी.ढवळे)
अधिक्षक
पुणे उरो रुग्णालय, औंध, पुणे-२७.